**ठळक बातम्या**

- कर्करोग मूनशॉट उपक्रमासाठी साडेसात दशलक्ष डॉलर आणि ४० दशलक्ष लस मात्रा देण्याची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची घोषणा

- श्रीलंकेत राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकी नॅशनल पीपल्स पॉवरचे अनुरा कुमार दिस्सनायके विजयी

- आगामी विधानसभा निवडणुकीसाठी महायुतीत रिपब्लिकन पक्षाला बारा जागा देण्याची केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची मागणी

- बुद्धिबळ ऑलिम्पियाड स्पर्धेत खुल्या प्रकारात भारताची सुवर्णपदकाला गवसणी

**आणि**

- चेन्नई कसोटीत बांगलादेशावर २८० धावांनी विजय मिळवत भारताची मालिकेत १-० अशी आघाडी

**<><><><><>**

क्वाड संघटनेच्या कर्करोग मूनशॉट उपक्रमामध्ये भारत, साडेसात दशलक्ष डॉलर्सचं, आणि गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोग प्रतिबंधासाठी ४० दशलक्ष लस मात्रांचं योगदान देईल अशी घोषणा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केली. क्वाड शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर डेलावेर इथं आयोजित कर्करोग मूनशॉट उपक्रमाला संबोधित करताना ते बोलत होते. सहज उपलब्ध होऊ शकेल अशी आणि दर्जेदार आरोग्य सेवा प्रदान करण्याबद्दल क्वाड समुह देशांचा सामायिक निर्धार अशा

उपक्रमातून प्रतिबिंबित होत असल्याचं ते यावेळी म्हणाले. प्रधानमंत्री कालपासून अमेरिकेच्या दौऱ्यावर आहेत. त्यांच्या या दौऱ्याविषयी ऐकूया वृत्तांत…

**होल्ड - वृत्तांत**

*(प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काल अमेरिकेत डेलावेर इथं झालेल्या क्वाड देशांच्या शिखर परिषदेच्या उद्घाटन सत्राला संबोधित केलं. मुक्त, खुलं, सर्वसमावेशक आणि समृद्ध हिंद - प्रशांत क्षेत्र हा क्वाड संघटनेचा एक सामायिक प्राधान्यक्रमावरचा विषय आहे, आणि त्यासाठी सर्व सदस्य देश वचनबद्ध असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.*

*सध्या जग तणाव आणि संघर्षानं वेढलेलं असताना ही परिषद होत आहे, अशावेळी क्वाड सदस्य देशांनी सामायिक लोकशाही मूल्यांच्या आधारावर एकत्र काम करणं संपूर्ण मानवतेसाठी खूप महत्वाचं असल्याचं ते म्हणाले. एका संघटनेच्या माध्यमातून एकत्र येणं याचा अर्थ कोणाच्याही विरोधात जाणं नाही, त्याउलट एकत्र येत काम करण्याचा अर्थ हा, नियमाधारित आंतरराष्ट्रीय सुव्यवस्था, सार्वभौमत्व आणि प्रादेशिक अखंडतेचा आदर आणि सर्व समस्यांचे शांततापूर्ण निराकरण करण्याला पाठबळ देणं असं आहे, असं ते म्हणाले. यावेळी प्रधानमंत्र्यांनी क्वाड संघटनेनं आरोग्य, सुरक्षा, अत्यावश्यक आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान, हवामान बदल आणि क्षमतावृद्धी सारख्या क्षेत्रांसाठी केलेल्या उपायोजनात्मक नियोजनाचा उल्लेख केला. २०२५ मध्ये क्वाडची शिखर परिषद भारतात होणार असल्याबद्दलही त्यांनी आनंद व्यक्त केला.*

*यावेळी सर्व सदस्य देशांच्या नेत्यांनी एकमतानं हिंद - प्रशांत क्षेत्रासह संपूर्ण जागतिक समुदायाच्या विकासाला प्राधान्य देणाऱ्या अनेक घोषणा केल्या. क्वाड शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्र्यांनी सदस्य देशांच्या प्रमुख नेत्यांच्या भेटी*

*घेतल्या. अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांच्या डेलावेर इथल्या निवासस्थानी भेट घेऊन चर्चा केली. तसंच जपानचे प्रधानमंत्री फुमियो कीशीदा आणि ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अँथनी अल्बानिज यांच्याशी देखील प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी द्विपक्षीय चर्चा केली. ही परिषद आणि इतर कार्यक्रम आटोपून प्रधानमंत्री न्यूयॉर्कला रवाना झाले आहेत.)*

न्यूयॉर्कमधे प्रधानमंत्री उद्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेत चांगल्या भविष्यासाठी बहुआयामी उपाययोजना या विषयावरच्या शिखर परिषदेला संबोधित करणार आहेत. या निमित्तानं ते अनेक देशांच्या प्रमुख नेत्यांसोबत द्विपक्षीय बैठका घेणार असून, महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय आणि प्रादेशिक मुद्द्यांवर चर्चा करणार आहेत.

**<><><><><>**

श्रीलंकेत राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत नॅशनल पीपल्स पॉवरचे अनुरा कुमार दिसनायके विजयी झाले आहेत. या निवडणुकीसाठी काल मतदान झालं. पहिल्या फेरीत कोणत्याही उमेदवाराला आवश्यक असलेली ५० टक्के मतं मिळाली नाहीत. त्यामुळे आघाडीच्या दोन उमेदवारांव्यतिरिक्त इतर सर्व उमेदवारांना वगळून त्यांना मिळालेली दुसऱ्या आणि तिसऱ्या पसंतीची मतं आघाडीच्या दोन उमेदवारांमध्ये विभागली गेली. त्यात सर्वाधिक मतं मिळाल्यानं दिसनायके यांना विजयी घोषित करण्यात आलं. सजिथ प्रेमदासा दुसऱ्या स्थानावर राहिले.

**<><><><><>**

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी रिपब्लिकन पक्षाला बारा जागा देण्याची मागणी पक्षाचे अध्यक्ष आणि केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी केली आहे. ते

नागपूर इथं बातमीदारांशी बोलत होते. महायुतीतल्या तीन प्रमुख पक्षांनी प्रत्येकी चार जागा रिपाईला द्याव्यात, असं ते म्हणाले. या सर्व जागा आमच्याच चिन्हावर लढवू, असंही आठवले यांनी स्पष्ट केलं.

मारवाडी फाउंडेशनतर्फे दिला जाणारा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती पुरस्कार आज आठवले यांना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. दलित चळवळीचं रूपांतर आर्थिक विकासाच्या चळवळीत होण्यासाठी रामदास आठवले यांनी पुढाकार घेतला, अशा शब्दांत गडकरी यांनी यावेळी आठवले यांची प्रशंसा केली.

**<><><><><>**

आगामी विधानसभा निवडणुकीत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष महाविकास आघाडी म्हणून, एकत्र लढणार असून, जागा वाटपासाठी चर्चा सुरु असल्याचं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी सांगितलं. ते आज बारामतीत बातमीदारांशी बोलत होते. आठवडाभरात या बाबत निर्णय होऊन त्यानंतर घटक पक्ष आपापले उमेदवार जाहीर करतील, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

हंगरीची राजधानी बुडापेस्ट इथं सुरू असलेल्या बुद्धिबळ ऑलिम्पियाड स्पर्धेत भारतानं खुल्या प्रकारात ऐतिहासिक कामगिरी करत सुवर्णपदकाला गवसणी घातली आहे. भारताच्या डी. गुकेश आणि अर्जुन एरीगैसी आणि डी. गुकेश या दोघांनी स्लोव्हेनियाविरुद्धच्या आपापल्या सामन्यांमध्ये विजय नोंदवला, तर महिलांच्या गटात अझरबैजानविरुद्धच्या सामन्यांत दिव्या देशमुख हिनं आपल्या प्रतिस्पर्ध्याचा पराभव केला. या दोन्ही गटांमधले इतर सामने अद्याप सुरू आहेत.

<><><><><>

चेन्नई इथं झालेल्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारतानं बांग्लादेशावर २८० धावांनी विजय मिळवला, आणि दोन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. विजयासाठी ५१५ धावांचा पाठलाग करत असलेल्या बांग्लादेशाचा दुसरा डाव, आज सामन्याच्या चौथ्या दिवशी पहिल्या सत्रातच २३४ धावांत आटोपला.

भारताचा गोलंदाज आर. अश्विन यानं दुसऱ्या डावात बांग्लादेशाचे ६ गडी बाद केले.

मालिकेतला दुसरा आणि अखेरचा सामना येत्या शुक्रवारी कानपूर इथं होणार आहे.

<><><><><>

मिक्स्ड मार्शल आर्ट्स कुस्ती स्पर्धेत विजय मिळवणारा संग्राम सिंह हा पहिला भारतीय कुस्तीपटू ठरला आहे. जॉर्जियाच्या तब्लिसी इथं सुरू असलेल्या गामा आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत संग्रामनं पाकिस्तानच्या अली रझा नसीर याच्यावर अवघ्या ९० सेकंदात मात केली. संग्राम हा या स्पर्धेच्या ९३ किलो वजनी गटात सर्वात वेगवान विजय नोंदवणारा भारतीय कुस्तीपटू ठरला आहे.

<><><><><>

नवी मुंबईत कोळी बांधवानी गरजेपोटी बांधलेली घरं नियमित करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्याची अधिसूचना लवकरच जरी केली जाईल असं, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. नवी मुंबईतल्या ऐरोली इथं उभारण्यात येणाऱ्या कोळी भवनाचं भूमिपूजन आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते कोळी भवनाचं भूमिपूजन झालं त्यावेळी ते बोलत होते. कोळी बांधव हे भूमिपुत्र असल्यामुळे त्यांना

नोकऱयांमध्ये प्राधान्य दिलं जाईल असंही ते म्हणाले. राज्यात जे प्रकल्प होत आहेत त्यामध्ये कोळी बांधवांच अस्तित्व नाकारलं जाणार नाही, असं आश्वासनही त्यांनी दिलं.

नवी मुंबई शहराचा विकास करताना शहराच्या आणि भूमिपुत्रांच्या गरजा लक्षात घेऊन सरकार काम करणार आहे, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या कार्यक्रमात बोलताना सांगितलं.

<><><><><>

परदेशी गुंतवणुकदारांनी या महिन्यात भारतीय शेअर बाजारात, आतापर्यंत ३३ हजार ६९१ कोटी रुपये गुंतवले आहेत. मात्र त्याचवेळी ऋणबाजारातून २४५ कोटी रुपये काढून घेतले आहेत. त्यामुळे त्यांची या महिन्यातली भारतीय भांडवल बाजारातली गुंतवणूक ३१ हजार ४४६ कोटी रुपये इतकी झाली आहे.

या वर्षात आतापर्यंत परदेशी गुंतवणुदारांनी भारतीय भांडवल बाजारात १ लाख ८० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक केली आहे.

<><><><><>

इराणच्या पूर्व भागात असलेल्या दक्षिण खोरासन प्रांतात एका कोळशाच्या खाणीत मिथेन गॅसची गळती होऊन झालेल्या स्फोटात किमान ५१ जणांचा मृत्यू झाला. ही घटना स्थानिक वेळेनुसार रात्री नऊ वाजता घडली. हा स्फोट झाला तेव्हा खाणीच्या दोन भागांमध्ये ६९ कामगार होते. या स्फोटात २० हून अधिक कामगार जखमी झाले आहेत. दरम्यान, खाणीत एकूण किती कामगार होते, याची माहिती नेमकी अद्याप हाती आलेली नाही.

<><><><><>

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयूष गोयल यांनी आज सिंगापूर इथल्या इन्व्हेस्ट इंडियाच्या नव्या कार्यालयाचं उद्घाटन केलं. हे कार्यालय भारतात गुंतवणूक करू इच्छिणाऱ्या कंपन्यांसाठी मध्यवर्ती केंद्र म्हणून काम करेल. देशाच्या वाढत्या अर्थव्यवस्थेत जागतिक गुंतवणूकदारांना विना अडथळा गुंतवणूक करता यावी यासाठी सरकार येत्या काही महिन्यांत परदेशात इन्व्हेस्ट इंडियाची अनेक कार्यालये उघडणार आहे, असं गोयल यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राष्ट्रीय कर्करोग दिनानिमित्त महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज राजभवनात कर्करुग्ण बालकांशी संवाद साधला. राज्यपालांनी या मुलांना फुलं आणि भेटवस्तू दिल्या. यावेळी मुलांना राजभवनही दाखवण्यात आलं. कॅन्सर पेशंट्स एड असोसिएशन या संस्थेनं हा कार्यक्रम आयोजित केला होता.

**<><><><><>**

पुढचे पाच दिवस महाराष्ट्राच्या चारही विभागांमधे तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**